# अंदाजपत्रकात जनसहभाग

**१४ जानेवारी २०११**

प्रज्ञा शिदोरे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासनव्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# अंदाजपत्रकात जनसहभाग

लोकशाहीमध्ये जनसहभागाला अनन्यसाधारण महत्व आहे. निर्णय प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर नागरिकांच्या मताची नोंद होणे आवश्यक असते. नागरि निर्णय प्रक्रियेची महानगरपालिका हि पहिली, पण आपल्या दैनंदिन जीवनावर सर्वाधिक परिणाम करणारी आहे.

पालिकेला स्थानिक समस्यांचा नेमका अंदाज यावा व त्यानूसार पावले उचलली जावीत यासाठी आशा जनसहभागाचा ऊपयोग होतो. म्हणुनच पालिकेच्या कामकाजात नागरिकांचा थेट सहभाग हे लोकशाही पध्दतीचे उत्तम उधारण आहे. म्हणुनच आपण आपल्या वॉर्डाचे प्रतिनिधित्व करताना ह्या महापालिकेच्या प्रयत्नात आपण विषेश लक्ष घातले पाहिजे.

प्रत्येक नागरिकाला आपल्या परिसरात अनेक बदल सुचवायचे असतात. जेव्हा तो त्याची समस्या घेउन महापालिकेकडे जातो, व त्या प्रमाणे महापालिका आपल्या वार्षिक अहवालात त्याची नोंद घेते तेव्हा नागरिकांचा प्रशासनावरचा व तसेच राजकिय प्रक्रियेवरचा वरचा विश्वास दृढ होतो. हा विश्वास कायम ठेवाण्यासाठी आपण ह्या जनसहभागाला चालना द्यायला हवी.

सन २००५ पासून पुणे महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग सुरु झाला. त्यावेळचे आयुक्त डॉ. नितीन करिर यांनी या संकल्पनेला चालना दिली. त्यानुसार पुणे शहरातील प्रत्येक नागरिक त्याच्या वॉर्डामध्ये काही चांगल्या कल्पना साकारण्यासाठी, वॉर्डाच्या विकासासाठी पुणे महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात सुचना देऊन आर्थिक तरतुद करून घेऊ शकतो.

महापालिकेच्या ह्या उपक्रमा द्वारे प्रत्येक वार्डात सुमारे १५ लाख रुपयांची कामे जनसहभागाने योजली जावी असे सुचीत केले आहे. २००६-०७ च्या अर्थसंकल्पात सुमारे २१ कोटिच्यावर तरतुदी ह्या जनसहभागाने झाल्या.

नागरिकांच्या सुचना ह्या महानगरपालिकेच्या कामाबाबत अर्थात पदपथ, रस्ते, पथदीप, बसस्थानके, सर्वजनिक शौचालये, कचराव्यवस्थापन, बाग-उद्याने, पाणी व गटारे या बाबतीतच सुचना स्विकारण्यात येतात.

अंदाजपत्रकातील जनसहभागा बद्दल जाहीर सुचना साधारण सप्टेंबर महिन्या मध्ये सर्व प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द होते.

<u>अंदाजपत्रकाती जनसहभाग वाढविण्यासाठी:</u>

1. वॉर्ड सभांचे आयोजन
2. परिसरामधील प्रमुख गृहरचना संकुले शोधून त्यांच्या सचिवांशी भेटी.
3. शाखाप्रमुखांच्या आठवडा बैठका.
4. आठवड्यातून एकदा open hour, जिथे कोणीही येउन आपली समस्या मांडू शकेल.
5. वॉर्डातील काही प्रतिष्ठित व्यक्तिंशी संपर्क.
6. वॉर्डाचा विकास आराखडा बनविण्याचा प्रयत्न.